SpellIndia
INDIA's No. 1
SPELLING BEE
Preparatory Study Material Provider
www.phonicsestore.com

ICSE ACADEMY
www.spellbeeacademy.com

Pati's

# PREPARE

for

# ICSE

Class 10

# MARATHI

Questions ONLY

A Collection of Questions from Prelim exam papers of various ICSE schools

Pati's

# ICSE ACADEMY: How to Prepare for ICSE Class 10 exams

https://www.spellbeeacademy.com/icse.html

## How to Prepare for ICSE Class 10 exams : Free Resources

Please click on subject to proceed further.


We will keep adding resources here till "March 2026".


So, save this link, keep visiting and stay updated.


( Resources include : Syllabus, Past Year Papers, Specimen Papers, Competency based Questions, Books pdf downloadable, 350+ Term Papers / Prelim Papers of various schools - across subjects, etc. )


01 English Literature
02 English Language
03 Geography
04 History & Civics
05 Physics
06 Chemistry
07 Mathematics
08 Biology
09 Computer Applications
10 Physical Education
11 Hindi
12 Commercial Studies
13 Economics
14 Technical Drawing
15 Environmental Science
16 Home Science
17 Gujarati
18 Marathi
19 French

SCAN QR code to buy the book at amazon NOW.

















**Scan QR code** for Free Access to
500+ Prelim Papers across 20 subjects


















ICSE ACADEMY

## Set 3a : Question Papers

1. AVM Group, Mumbai
2. Vasant Vihar High, Thane

2025-2026 - Prelim 2

# ARYA VIDYA MANDIR GROUP OF SCHOOLS

STD: X | PRELIMS REVIEW JANUARY- 2026 | Marks: 80

MARATHI SECOND LANGUAGE

DATE: 06/01/2026 | Time: 3 hrs.

***Answers to this paper must be written on the paper provided separately.***
*You will **not** be allowed to write during the first **15** minutes.*
*This time is to be spent in reading the question paper.*
***The time given at the head of this paper is the time allowed for writing the answers.***

*This paper comprises two sections. **Section A** and **Section B.***
*Attempt **all** the questions from **Section.***
*Attempt **four** questions from **Section B**, answering at least **one** question each from the **two** books you have studied and **any two** other questions.*
*Two intended marks for the questions or para of questions are given in brackets [ ].*
*This paper comprises 8 printed pages.*

## SECTION –A (40 Marks)

*Attempt **all** questions*

**Question 1**

**Write a short composition in Marathi of approximately 250 words on any one of the following topics : -** [15]

**खाली दिलेल्या विषयापैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २५० शब्दांचा संक्षिप्त निबंध लिहा**

(i) खेळ म्हणजे शारीरिक व मानसिक आरोग्य टिकवण्याचे साधन - मानवी जीवनात खेळांचे अनन्यसाधारण महत्त्व - प्राचीन काळापासून खेळांची परंपरा - मैदानी व मैदानी नसलेले खेळ - शारीरिक व मानसिक विकासात खेळांची भूमिका - सामाजिक गुणांचा विकास संघभावना निर्माण होते - सहकार्याची सवय - नेतृत्वगुण विकसित - शिक्षण व खेळ - राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तर -देशाचा गौरव - आधुनिक जीवनात खेळांची गरज - तंत्रज्ञानामुळे कमी हालचाल - मुलांमध्ये मोबाईलचा अति वापर - आधुनिक जीवनात खेळांची गरज

(ii) शालेय दिवस म्हणजे आयुष्यातील सुवर्णकाळ - निरागसता, आनंद व शिकण्याचा काळ - शाळेचे वातावरण - शाळेची इमारत व परिसर - प्रार्थना सभा - वर्गातील शिस्त व आनंदी वातावरण - शिक्षकांचे स्थान - ज्ञानासोबत संस्कार देणारे - मित्रमैत्रिणी - एकत्र अभ्यास व खेळ - सुख-दुःखात सहभागी होणे - अभ्यास व उपक्रम - खेळ व सहशालेय उपक्रम - गणवेश व वेळेचे पालन नियम व जबाबदाऱ्या - शालेय दिवसांचे महत्त्व - शालेय दिवस कधीही न विसरणारे व कधीही न परत फिरून येणारे - आयुष्यातील अमूल्य काळ. अशाच शालेय आठवणीच्या प्रसंगाचे वर्णन करा.

(iii) मी पाण्याचा थेंब - पृथ्वीवरील जीवनाचा अविभाज्य भाग - सर्व सजीवांना माझी गरज - माझे महत्व - माणसाचे जीवन टिकवणे - प्राणी, पक्षी आणि वनस्पतींसाठी जीवनसत्त्व - शेती व कृषीसाठी आवश्यक - माझा प्रवास - झरे, नदी, धरणे, पावसाद्वारे पृथ्वीवर फिरणे - कधी थंड आणि कधी उबदार अनुभवणे - आकाशातून वर्षाव किंवा झऱ्यांतून प्रवास -


Pati's ICSE ACADEMY



अडचणी - प्रदूषणामुळे शुद्धता कमी होणे -कचरा, प्लास्टिकमुळे विषारी होणे- लोकांकडून योग्य जतन न होणे - संदेश - लोकांनी पाण्याचे संवर्धन करावे - अनावश्यक पाण्याचा वापर टाळावा -पाणी वाचवणे म्हणजे जीवन वाचवणे - 'पाण्याचा एक थेंब' आपले मनोगत व्यक्त करत आहे याबद्दल आत्मकथनात्मक निबंध लिहा.

(iv) 'ऐकावे जनाचे करावे मनाचे' या म्हणीचा अर्थ उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट करा किंवा त्यावर आधारित गोष्ट लिहा.

(v) पुढे दिलेले चित्र पहा व त्याआधारे आपल्या मनात कोणते विचार येतात .... त्याचे वर्णन करा.



## Question 2

Write a letter in Marathi of approximately 120 words on any one of the topics given below - - (7)

खाली दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे १२० शब्दापर्यंतचे पत्र मराठीत लिहा.

(i) मोबाईलचा अतिवापर टाळण्याबद्दलचे मार्गदर्शनपर पत्र आपल्या लहान भावाला / बहिणीला लिहा.

किंवा

(ii) तुमच्या राहत्या विभागात पाण्याची टंचाई असल्याचे तक्रारपत्र मुंबई महानगरपालिकेला लिहा.

Pati's
ICSE ACADEMY

## Question 3

Read the passage given below and answer in Marathi the questions that follow, using your own words as far as possible – [10]

**खाली दिलेला उतारा नीट काळजीपूर्वक वाचा आणि त्यावर आधारलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या स्वतःच्या शब्दांत मराठीत लिहा.**

'आत्मविश्वास' हा व्यक्तिमत्त्वाचा अत्यंत महत्त्वाचा गुण आहे. आत्मविश्वास असलेली व्यक्ती कोणत्याही परिस्थितीत धैर्याने उभी राहते. जीवनात यश मिळवण्यासाठी केवळ बुद्धिमत्ता पुरेशी नसते, तर आत्मविश्वासही तितकाच आवश्यक असतो. आत्मविश्वासामुळे माणूस स्वतःवर विश्वास ठेवतो. अपयश आले तरी तो खचून जात नाही. चुका झाल्यास त्यातून शिकण्याची तयारी तो ठेवतो. आत्मविश्वास व्यक्तीला योग्य निर्णय घेण्यास मदत करतो. आत्मविश्वासामुळे भीती, संकोच व न्यूनगंड दूर होतो. आत्मविश्वास असलेली व्यक्ती आपली मते स्पष्टपणे मांडू शकते. शाळा, महाविद्यालय, कार्यालयात तसेच आपल्या दैनंदिन जीवनात आत्मविश्वासामुळे व्यक्ती प्रभावी ठरते. आत्मविश्वास नसल्यास संधी असूनही माणूस मागे राहतो, त्या व्यक्तीच्या मनात सतत नकारात्मक विचार वाढीस लागतात त्यामुळे कोणत्याही क्षेत्रात ती इतरांपेक्षा उत्कृष्ठ गुण असूनही ती व्यक्ती आत्मविश्वासाअभावी मागे राहते.

आत्मविश्वास सरावाने वाढवता येतो. सकारात्मक विचार, मेहनत आणि सातत्य यांमुळे आत्मविश्वास वाढतो. स्वतःच्या क्षमतेची ओळख करून घेणे महत्त्वाचे असते. आत्मविश्वासामुळे नेतृत्वगुण विकसित होतात. समाजात आत्मविश्वासू व्यक्तीचा आदर केला जातो. आत्मविश्वास जीवनातील अडथळे पार करण्याची शक्ती देतो. तो व्यक्तीला सतत पुढे जाण्यास प्रेरित करतो. त्यामुळे प्रत्येकाने आत्मविश्वास वाढवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

१) आत्मविश्वास असलेली व्यक्ती अपयश आल्यावर कशी प्रतिक्रिया देते? [2]
२) आत्मविश्वासामुळे व्यक्तीला कोणते मानसिक लाभ होतात? [2]
३) जीवनात यश मिळवण्यासाठी आत्मविश्वास का आवश्यक आहे? [2]
४) आत्मविश्वास नसल्यास व्यक्तीच्या जीवनावर काय परिणाम होतो? [2]
५) आत्मविश्वास दाखवल्याचा तुमचा एक अनुभव थोडक्यात सांगा. [2]

## Question 4

Choose the correct answer from the options given :- [8]

**दिलेल्या पर्यायांतून अचूक उत्तराची निवड करा.**

i) पत्नी व विज या शब्दांचे समानार्थी शब्द अनुक्रमे पुढीलप्रमाणे असेल ----------------

a) श्री, ललना
b) वैष्णवी, सिंधू
c) कांता, सौदामिनी
d) कांचन, इंदिरा

ii) पुढारी व सुरस या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द अनुक्रमे पुढीलप्रमाणे असेल ----------------

a) विधायक, अज्ञ

b) अनुयायी, नीरस

c) सहकारी, वीरस

d) स्वकीय, किळस

iii) श्रीमान व बायको यांचे लिंग बदलल्यास अनुक्रमे उत्तर पुढीलप्रमाणे असेल ----------------

a) कुमारी, अनुज

b) श्रीमती, नवरा

c) श्रीयुत , भ्राता

d) युवती, तनु

iv) जाऊ व पिसू यांचे वचन बदलल्यास अनुक्रमे उत्तर पुढीलप्रमाणे असेल ------------

a) जाव , पीस

b) जावूडी , पिसुडी

c) जावीनी , पिसुनी

d) जावा, पिसवा

v) शंकराची उपासना करणारा व शत्रूकडील बातम्या काढून आणणारा .....या शब्दसमूहासाठी एक अनुक्रमे पुढीलप्रमाणे असतील -------------

a) विधुर, मनकवडा

b) शैव, हेर

c) हुतात्मा, घरभेदी

d) प्रेषक, अप्पलपोटा

vi) 'थंड फराळ करणे' या वाक्प्रचारासाठी अचूक अर्थ पुढीलप्रमाणे असेल ------------

a) माघार घेणे

b) त्याग करणे

c) उपाशी राहणे

d) फजिती होणे

vii) कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईट असतो' याअर्थी पुढीलपैकी म्हण वापरतात ----------

a) अती शहाणा त्याचा बैल रिकामा

b) इकडे आड तिकडे विहीर

c) अति तिथे माती

d) अकलेचा खंदक

viii) निखिल चांगला अभ्यास का करत नाहीस? (विधानार्थी वाक्य करा.)

a) अरे व्वा! निखिल तू चांगला अभ्यास केलास.

b) निखिल तू चांगला अभ्यास कर.

c) निखिल तू चांगला अभ्यास केला का ?

d) निखिल तू चांगला अभ्यास नाही केलास तर अनुत्तीर्ण होशील.

## SECTION – B (40 Marks)

### Question 5

Read the extract given below and answer in Marathi the questions that follow. [10]

**खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा.**

पुढल्या वेळी मला जगमोहन त्याच्या खेळण्यांच्या प्रदर्शनामध्ये भेटला. तेवढ्यात वरूणही तिथं आला. चौदा वर्षांचा वरुण जगमोहनचंच हाडपेर घेऊन आल्यामुळे अठरा वर्षांचा असल्यासारखा दिसत होता. आज चारांतल्या तीन गाड्या प्रदर्शनात असल्यामुळं त्यातली एखादी डोळा चुकवून नेता येण्यासारखी नव्हती. म्हणून तो वडिलांची रीतसर परवानगी विचारायला आला होता.

"ने- पण नो स्पीडिंग।" जगमोहननं कौतुकानं ताकीद दिली, "पोलिसांनी स्पीडिंगसाठी पकडलं, तर अजून तुझ्याकडे लायसन्स नाहीये, लक्षात ठेव!

वेग
मधु. मंगेश कर्णिक

प्रश्न :

1. जगमोहनने कॉलेज का सोडले ? व तो नोकरी का करू लागला? [2]
2. 'मीच दोषी आहे भाऊ !' असे जगमोहन कोणास व का म्हणाला ? [2]
3. जगमोहनला वेगाचे वेड होते हे विधान उदाहरणासह स्पष्ट करा. [3]
4. ' वेग ' या पाठातून आपणांस कोणती शिकवण मिळते ? [3]

### Question 6

Read the extract given below and answer in Marathi the questions that follow. [10]

**खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा.**

काळा ढग कुठेच दिसत नव्हता मात्र धरणी स्नान-मंदिरातून बाहेर पडणाऱ्या तरुणीसारखी दिसत होती. वृक्षलता गुदगुल्या झालेल्या बालकांप्रमाणे हसत होत्या आणि पाखरे झाडांवर बसून आनंदाने आपली अंगे झाडीत होती.

पांढरा ढग स्वर्गाच्या दारात जाऊन पोहोचला. आपल्याला आत सहज प्रवेश मिळेल अशी त्याची कल्पना होती.

पण दारावरला रक्षक त्याला आत येऊ देईना तो सांगू लागला,

- दोन मेघ

1. पांढऱ्या ढगाला दिव्य तेजाचा साक्षात्कार झाला ? व कसा ? [2]
2. दोन मेघ कोठे चालले होते ? का? [2]
3. पांढऱ्या ढगाने पृथ्वीवर वळून बघताच त्याला कोणते दृश्य दिसले ? स्पष्ट करा. [3]
4. पांढरा ढग व काळा ढग या दोन रुपकाद्वारे लेखकाने कोणता संदेश दिला आहे ? वि. स. खांडेकर [3]

## Question 7

Read the extract given below and answer in Marathi the questions that follow. [10]

**खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा.**

"नि त्या पोपटांनी काय खावं रे - "

खरेच हा विचार आलाच नाही आपल्या डोक्यात आपण त्यांचे धान्य आणले काय तर त्यांनी काय खावे? पोपटांची झाली तरी ती चोरीच. क्षणभर विचार करून तो उतरला,

"ते आणतील दूसर भात. त्यांना कोण अडवणार आहे? बोलून चालून ते पक्षी " .

म्हणजे पुन्हा चोरीच -पक्ष्यांनी माणसांची चोरी करायची. माणसांनी पुन्हा पक्ष्यांची चोरी करायची - म्हणजे माणसांनी माणसांची चोरी केली - नाही का ?

- चोरी
रत्नाकर मतकरी

1. शाळा सुटल्यावर आई गोपूला कुठे घेऊन गेली? का ? [2]
2. शेतातील धान्य गोळा करताना गोपूच्या मनात कोणकोणते विचार आले ? [2]
3. गोपूच्या डोळ्यात पाणी का आले? गोपूने भातकेसरे कशी मिळवली होती? का? [3]
4. 'माणसाने माणसाची चोरी केली, असे आई का म्हणते? यातून आपणांस आईविषयी काय वाटते ? [3]

## Question 8

Read the extract given below and answer in Marathi the questions that follow. [10]

**खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा.**

विंचू चावला वृश्चिक चावला ।। धृ.।।
कामक्रोध विंचू चावला । तव घाम अंगासी आला ।
पंचप्राण व्याकुळ झाला । त्याने माझा प्राण चालिला ।
सर्वांगाचा दाह झाला ।। १ ।।

एकनाथ

- भारूड : विंचू चावला

1. संत एकनाथांनी कोणत्या अवगुणांना विंचवाची उपमा दिली आहे. [2]

Pati's
ICSE ACADEMY

2. 'विंचू चावला' या भारुडातून नाथांनी कोणता बोध / उपदेश केला आहे ? [3]

देह देवाचे मंदिर । आंत आत्मा परमेश्वर ।। १ ।।
जशी ऊसांत हो साखर । तसा देहांत हो ईश्वर ।। २ ।।

तुकाराम

- देह देवाचे मंदिर

1. 'कांहो जाता देवळात' असे कोणी, कोणास व का म्हंटले आहे? [2]
2. संत तुकाराम 'देह देवाचे मंदिर 'असे सांगताना कोणती उदहारणे देतात ते स्पष्ट करा. [3]

## Question 9

Read the extract given below and answer in Marathi the questions that follow.
खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. [10]

'ओळखलंत का सर मला' - पावसात आला कोणी
कपडे होते कर्दमलेले केसावरती पाणी.
क्षणभर बसला नंतर हसला बोलला वरती पाहून :
'गंगामाई पाहुणी आली, गेली घरट्यात राहून;
माहेरवाशीण पोरीसारखी चार भिंतींत नाचली

- कणा

1. कोणत्या संकटातून तरुण पुन्हा नव्याने उभा राहण्याचा प्रयत्न करत आहे? तो सरांना ओळखलंत का? असे का विचारतो ? [2]
2. मुलावर कोणता बिकट प्रसंग ओढावला होता ? गंगामाईला तो कोणाची उपमा देतो ? [2]
3" मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा " ही ओळ स्पष्ट करा. [3]
4. 'कणा' या कवितेतून कवीला आपल्याला काय सांगायचे आहे? [3]

## Question 10

Read the extract given below and answer in Marathi the questions that follow.
खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. [10]

माझा मराठीचा बोल
माझी मराठी माऊली
तिची विठोबा साऊली
ज्ञाना नामा तुका एका उभे कैवल्य राऊळी

Pati's
ICSE ACADEMY

- माझा मराठीचा बोल

प्रश्न :

1. अबीर आणि गुलाल यातून कवीला काय सुचवायचे आहे ? [2]

2. मराठी भाषेत अमृताची ओल आहे असे का म्हटले आहे ? [2]

3. 'माझ्या मराठी मातीची खोलवर रूजे नाळ,सळसळतो आतून माझ्या रक्तात पिंपळ'अर्थ स्पष्ट करा. [3]

4. 'माझा मराठीचा बोल' या कवितेत कवीने मराठीची आध्यात्मिक परंपरा कशाप्रकारे स्पष्ट केली आहे. ते स्पष्ट करा. [3]

विनोद कमबळे

************************************** THE END**************************************

[redacted]

Pati's ICSE ACADEMY

# Question Paper 2

GOENKA & ASSOCIATES EDUCATIONAL TRUST

VASANT VIHAR HIGH SCHOOL AND JUNIOR COLLEGE

GRADE -10 | PRE BOARD EXAM 2025-26 | MARKS:80

DATE: 07-01-26 | SUB:MARATHI 2nd LANGUAGE | TIME: 3HOURS

NO. OF PAGES: 09

NAME:______________________________ DIVISION __________ ROLL NO: ______

Answers to this Paper must be written on the paper provided separately
You will not be allowed to write during the first 15 minutes.
This time is to be spent in reading the question paper.
The time given at the head of this Paper is the time allowed for writing the answers.

**Section A** is compulsory – **All** questions in **Section A** must be answered.
Attempt **any four** questions from **Section B,** answering at least **one** question each from the two books you have studied and **any two** questions from the same books you have studied.
The intended marks for questions or parts of questions are given in brackets [ ].

SECTION-A (40 MARKS)
(Attempt all questions from this Section)

VVHS&JC

**Question 1**

**Write a short composition in Marathi of approximately 250 words on any one of the following topics:-** **(15)**

**खालील दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे 250 शब्दांचा मराठीत संक्षिप्त निबंध लिहा:-**

(i) असे म्हणतात की योग्य वेळी योग्य काम केले की नंतरचा घोटाळा वाचतो. वेळीच काळजी घेतली की पुढे येणारे मोठे संकट टळते. एखादे काम नियोजनबद्ध आखून केले की वेळ वाचतो. तसेच ते काम वेळेत पूर्ण होते. त्यामुळे अनेक इतर कामे करण्यास उत्साह प्राप्त होतो. कोणतेही काम करण्यास कंटाळा येत नाही. आयुष्य उल्हासित आणि उत्कंठावर्धक होते. तुमचे अनुभव लिहा.

(ii) जगातील प्रत्येकाचे दुःख नाहीसे झाले तर! कल्पना करा आणि लिहा.

(iii) एका संध्याकाळी आपण समुद्रकिनारी जाता. समुद्राचे रूप, लाटा, आवाज अनुभवता. समुद्रकिनारची वाळू, सूर्यास्त, आकाशाचा रंग, पक्ष्यांचे घरट्याकडे परतणे. सारे सौंदर्य पाहून मन प्रसन्न होते. खरा आनंद येथे गवसतो. याविषयी लिहा.

(iv) तुम्ही शालेय जीवन संपवून महाविद्यालयात प्रवेश घेणार आहात. शाळा सोडून जाण्याची तुमची इच्छा नाही. परंतु परिस्थिती स्विकारावी लागणार आहे. खरी शाळा आता सुरु होणार आहे. तुम्हांला शाळेविषयी, शिक्षकांविषयी आपुलकी, आदर आहे. त्या दृष्टीने आपल्या भावना व्यक्त करा.

v) पुढे दिलेले चित्र पहा त्याआधारे आपल्या मनात कोणते विचार येतात त्याचे वर्णन करा.



**Question 2**

**Write a letter in Marathi of approximately 120 words on any one of the topics given below:- (7)**

**खाली दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे 120 शब्दांपर्यंतचे पत्र मराठीत लिहा.**

(1) आपण आपल्या मित्र परिवारांबरोबर अनेक वृद्धाश्रमांना भेटी दिल्या. त्यांच्या मनातील कथा, व्यथा जाणून घेतल्या. त्यांचे मनोबल वाढवून आपुलकी, माया, प्रेम, वात्सल्य यांचा वर्षाव केला. त्यांना आनंद देता-देता तुम्हांला आनंद कशाप्रकारे गवसला, याचे हृदयस्पर्शी वर्णन करणारे पत्र गावी असलेल्या तुमच्या आजोबांना लिहा.

Pati's
ICSE ACADEMY



(2) आपल्या विभागात मोबाईल टॉवर्सची वाढती संख्या लक्षात घेऊन भविष्यकाळात त्यापासून असणा-या धोक्याविषयीची जाणीव करून देणारे व याविरोधात तक्रार करणारे पत्र ग्राहक हक्क समिती,जनजागृती विभाग,यांच्याकडे पाठवा.

**Question 3**

**Read the passage given below and answer in Marathi the questions that follow, using your own words as far as possible.**

**खालील दिलेला उतारा नीट काळजीपूर्वक वाचा आणि त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे तुमच्या स्वत:च्या शब्दांत मराठीत लिहा:-**

एकदा कृष्ण आणि अर्जुन एका गावाच्या दिशेने चालत निघाले होते.अर्जुन कृष्णाला सारखा विचारत होता,"कर्णालाच का सगळे सर्वश्रेष्ठ दाता म्हणून संबोधतात आणि मला का नाही?"लगेच कृष्णाने समोरच्या दोन टेकड्यांचे रूपांतर सोन्याच्या टेकड्यांमध्ये केले आणि अर्जुनाला म्हणाला,"हे सगळे सोने गावकऱ्यांमध्ये वाटून टाक.अट एकच.एकूण एक सोने तू दान केले पाहिजेस."लगेच अर्जुन जवळच्या गावात गेला आणि तिथे त्याने जाहीर केले,की मी प्रत्येक गावकऱ्याला सोने दान करणार आहे आणि त्यासाठी प्रत्येकाने टेकडीपाशी यावे.लोक अर्जुनाच्या मागे टेकडीच्या दिशेने चालू लागले.अर्जुन छाती काढून पुढे चालत होता.मागे गावकरी त्याचा जयजयकार करत होते.दोन दिवस,दोन रात्री काम-चालू होते.अर्जुन खोदत होता आणि सोने काढून लोकांना देत होता.पण टेकडी थोडी देखील संपली नव्हती.लोक सोने घेऊन घरी जायचे आणि परत येऊन जागेत उभे राहायचे.आता अर्जुन अगदी दमून गेला होता;पण अहंकार त्याला माघार घेऊ देत नव्हता.शेवटी त्याने कृष्णाला सांगितले,की आता बस.यापुढे तो काम करू शकत नाही.

मग कृष्णाने कर्णाला बोलावले आणि सांगितले,की या दोन सोन्याच्या टेकड्या आहेत.त्या तू लोकांना दान करून टाकायच्या.लगेच कर्णाने पंचक्रोशीतील गावकऱ्यांना बोलावले आणि सांगितले," या दोन सोन्याच्या टेकड्या तुमच्या आहेत."एवढे सांगून कर्ण तिथून निघून गेला.लोक सोने वाहून नेऊ लागले. अर्जुन चकित होऊन पाहत बसला.हा विचार आपल्या मनात का आला नाही?या प्रश्नाने तो अस्वस्थ झाला.

कृष्ण मिश्किलपणे हसला आणि म्हणाला,"अनावधानाने का होईना,तू सोन्याकडे आकर्षित झालास. तू गर्वाने प्रत्येक गावकऱ्यांना सोने वाटू लागलास.जणू काही आपण उपकार करत आहोत अशा थाटात तू दान करत होतास.कर्णाच्या मनात असले काही नव्हते. त्याने दान केले आणि तो निघून गेला.आपले कुणी कौतुक करते,गुणगान गाते हे पाहण्यासाठी देखील तो थांबला नाही.व्यक्ती प्रकाशाच्या मार्गावर चालत असल्याचे हे लक्षण आहे. शुभेच्छा,धन्यवाद द्यावे अशी अपेक्षा ठेवणे,म्हणजे ते काही निरपेक्ष दान नसते. कुठल्याही परताव्याची अपेक्षा न ठेवता दान करावे."

**प्रश्न :**

i) अर्जुनाने कृष्णाला कोणता प्रश्न विचारला? [2]

ii) कृष्णाने अर्जुनाच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी काय केले? त्याने त्यासोबत कोणती अट घातली? [2]

iii) अर्जुन कशामुळे थकून गेला? [2]

iv) कर्णाने सोन्याचे वाटप कसे केले? [2]

v) भारतीय संस्कृतीमध्ये दान करण्याला अत्यंत महत्त्व आहे.असे म्हणतात,एका हाताने दिलेले दान दुसऱ्या हाताला कळू देता कामा नये.त्यामुळे दान करण्याविषयी तुमचे मत थोडक्यात लिहा. [2]

VVHS&JC

**Question 4**

**Choose the correct answers from the options given:-** **(8)**

**दिलेल्या पर्यायातील अचूक उत्तराची निवड करा:-**

i) वार व रुपया या शब्दांचे वचन बदलल्यास अनुक्रमे उत्तर पुढील प्रमाणे असेल.

a) वारे, रुपये b) रुपये, वारा

c) वारे, रूपया d) वार, रुपये

Pati's
ICSE ACADEMY



ii) बंधू व ताई या शब्दांचे लिंग बदलल्यास अनुकमे उत्तर पुढीलप्रमाणे असेल.

a) भगिनी, दादा
b) दादा, बांधवी
c) बांधवी, दादा
d) बंधिनी, दादा

iii) लक्ष्मी व पक्षी या शब्दांच्या समानार्थी शब्दांचे अनुक्रमे उत्तर पुढीलप्रमाणे असेल.

a) रमणी, पक्षिणी
b) रमा, विहंग
c) दारा, खागा
d) मोहिनी, वात

iv) देशभक्त व स्वार्थ या शब्दांच्या विरुधार्थी शब्दाचे अनुक्रमे उत्तर पुढील प्रमाणे असेल.

a) देशप्रेमी, अप्पलपोटा
b) देशशत्रू, हेरार्थ
c) देशद्रोही, परमार्थ
d) दानव, नकारार्थ

v) पूराने लोकांची घरे वाहून गेली .... काळ ओळखा.

a) वर्तमान काळ
b) भूतकाळ
c) भविष्यकाळ
d) मिश्रकाळ

vi) वा! छानच चित्र काढलेस! ...... वाक्य प्रकार ओळखा.

a) आज्ञार्थी वाक्य
b) विधानार्थी वाक्य
c) प्रश्नार्थी वाक्य
d) उद्गारार्थी वाक्य

vii) वर्गात दिलेला समूहाचा प्रकल्प आकाशने कष्ट करुन पूर्ण केला आणि ऐनवेळी मनीष प्रकल्पाबद्दल बोलण्यास उभा राहिला. मनिषचे हे वागणे म्हणजे असे होते की, म्हणतात ना....

a) आयत्या बिळावर नागोबा
b) अति तेथे माती
c) कर नाही त्याला डर कशाला
d) उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग

viii) शरदने मिळवलेल्या यशाबद्दल सर्वांनी त्याची स्तुती केली.

a) चेहरा काळवंडणे
b) खसखस पिकणे
c) वाखाणणी करणे
d) जिवाचे रान करणे

## SECTION - B

(Attempt four questions from this section)

(You must answer at least one question from each of the two books, you have studied and any two other questions.)

### कथाकुंज

### KATHAKUNJ (Katha Sankalan - Short Stories)

**Question 5**

**Read the Extract given below and answer in Marathi the questions that follow:-**

**खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा:-**

नंतर कधीतरी काकाचा निरोप घेऊन जगमोहन माझ्याकडे आला. मला तो चांगलाच चुणचुणीत वाटला, कपडे साधेच, पण व्यवस्थित आणि डोळयांत भरतील, अशा रंगाचे होते. मी त्याला सहज विचारलं- "कॉलेज काय म्हणतयं ?"

"सोडलं" तो रुबाबात म्हणाला, "मी नोकरी धरलीय, एका टॉय शॉपमध्ये सेल्समन म्हणून,"

( वेग )

प्रश्न :

(i) जगमोहनने कॉलेज का सोडले ? (2)

(ii) जगमोहनचा सेल्समन ते आंतरराष्ट्रीय पातळीवरचा व्यवसायिक प्रवास थोडक्यात लिहा. (2)

(iii) जगमोहनने जीवनात काय गमावले ? त्यासाठी तो स्वतःला दोषी का मानतो ? (3)

(iv) 'वेग' या पाठातून आपणांस कोणती शिकवण मिळते ? (3)

Pati's
ICSE ACADEMY



**Question 6**

**Read the Extract given below and answer in Marathi the questions that follow:-**

**खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा:-**

दादा पुन्हा रजिस्टरमध्ये डोके घालून बसले. आकडेमोड करू लागले. आश्रमातील मुलांबरोबर त्यांचं आणि अन्य कर्मचाऱ्यांचंही जेवण भरपेट झालं होतं. मुलांना देऊन उरलेले पदार्थ कर्मचाऱ्यांना देण्यात आले होते. तेही सुस्त होऊन घरी परतले होते, दादांनी एका कागदावर अन्नदान केलेल्यांची नावं लिहिली. सातजणांनी अन्नदान केलं होतं. मुलांची खूप चंगळ झाली असेल. असं त्यांनी मनात म्हटलं.

( पुण्य )

प्रश्न :

(i) आश्रमातील मुलांचे डोळे का जड झाले होते? (2)

(ii) संस्थांचा मुलांना जेवण देण्याचा हेतू म्हणजेच उद्देश काय असे? (2)

(iii) मानव संस्थेची माहिती लिहा. (3)

(iv) किसन भाऊ कोण होते ? त्यांच्याविषयी थोडक्यात माहिती लिहा ? (3)

**Question 7**

**Read the Extract given below and answer in Marathi the questions that follow:-**

**खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा:-**

उजव्या हाताचा सराव असलेला गोलंदाज एकाएकी डाव्या हाताने बोलिंग कशी करू शकेल? केलीच तरी ती नेहमीप्रमाणे अचूक आणि प्रभावी असणार नाही अशी सर्वांनी अपेक्षा होती. ही ओव्हर भारताला भलतीच महाग जाणार अशी अटकळ रेडिओ आणि टी.व्ही. चे कॉमेंटेटर करत असतानाच, रांगणेकरच्या पहिल्याच चेंडूने एम.सी.सी. च्या फलंदाजाची विकेट उडाली! पॅव्हिलयनकडे परतताना नवीन फलंदाजाला "चेंडू फारच अनपेक्षितपणे आला काळजी घे." अशी त्याने सूचना केली.

( उजव्या सोंडेचा गणपती )

प्रश्न :

(i) संजू लेखकाकडे का येणार होता ? (2)

(ii) संजूशी भेट होताच लेखक का अस्वस्थ झाले ? (2)

Pati's ICSE ACADEMY



(iii) स्वतःवर प्रयोग केल्यावर संजूत कोणता बदल झाला ? (3)

(iv) संजूने लेखकापुढे कोणता प्रस्ताव मांडला ? (3)

## काव्यांगण

## Kavyangan (Kavya - Sankalan)

**Question 8**

**Read the lines given below and answer in Marathi the questions that follow:-**

**खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा:-**

काटंकुटं - किडकाची लागे कधी वाट
कधी उतरण, कधी चढणीचा घाट
तरी पाय चालतात कुरकुर नाही !
पालखीचे भोई, आम्ही पालखीचे भोई !

( पालखीचे भोई )

(i) देणाऱ्याचं ओझं काय न्यावयाचं नाही?' विचार स्पष्ट करा. (2)

(ii) भोयाला पालखीचा दांडा जड केव्हा वाटतो? (2)

(iii) भोयांचा व्यवसाय काय आहे? त्यांचा धंदा महत्त्वाचा कसा असतो ? (3)

(iv) 'पालखीचे भोई' या कवितेतून कष्टाळू जनतेच्या शोषिकतेचे दर्शन कसे घडते ? (3)

**Question 9**

**Read the lines given below and answer in Marathi the questions that follow:-**

**खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा:-**

देण्याऱ्याने देत जावे;
घेणाऱ्याने घेत जावे;
घेता घेता एक दिवस
देणाऱ्याचे हात घ्यावे !

( घेता )

(i) उसळलेल्या दर्याकडून पिसाळलेली आयाळ घ्यावी अर्थ स्पष्ट करा. (2)

(ii) भरलेल्या भिमेकडून तुकोबाची माळ घ्यावी ही ओळ स्पष्ट करा? (2)

Pati's
ICSE ACADEMY



(iii) "सह्याद्रीच्या कड्याकडून छातीसाठी ढाल घ्यावी." या पक्तीतून कवी पाडगावकर यांना काय सूचवायचे आहे. (3)

(iv) ढगांचे आकार वेडेपिसे आहेत असे कवीला का वाटते? (3)

**Question 10**

**Read the lines given below and answer in Marathi the questions that follow:-**

**खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा:-**

माझी मराठी माऊली

तिची विठोबा साऊली

ज्ञाना नामा तुका एका उभे कैवल्य राऊळी

( माझा मराठीचा बोल )

(i) मराठी भाषेत अमृताची ओल आहे असे का म्हटले आहे? (2)

(ii) मराठी माऊलीची विठोबा साऊली आहे.' कल्पना स्पष्ट करा. (2)

(iii) 'चंद्रभागा उरी कालविते घास' यातून कविला काय म्हणायचे आहे? (3)

(iv) कवीने मराठी भाषेचा अभिमान कसा व्यक्त केला आहे ? (3)

VVHS & JC

**Scan QR code** for Free Access to
500+ Prelim Papers across 20 subjects

